# भारताची राज्यघटना

i) उगमस्थाने / स्त्रोत
ii) उद्देशपत्रिका
iii) वैशिष्ट्ये

I] प्रस्तावना -

देशाचा राज्यकारभार करण्यासाठी जे लिखित किंवा अलिखित नियम तयार केले जातात, त्याच नियमाच्या समूहाला संविधान किंवा राज्यघटना असे म्हणतात. प्रत्येक देशाचा राज्यकारभार करण्यासाठी, शांतता, सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी, नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी राज्यघटनेची आवश्यकता असते. राज्यघटना नसेल तर देशात अशांतता, गोंधळ, गडबड, अन्याय, अत्याचार, पिळवणुक, जुलूम-जबरदस्ती किंवा बळी तो कान पिळी अशी व्यवस्था अस्तित्वात येते.

संविधानाची निर्मिती एका संविधान सभेद्वारे किंवा घटनापरिषदेद्वारे केली जाते. संविधानसभेचा विचार सर्वप्रथम हेन्री मेन यांनी मांडला, परंतु अमेरिकेने सर्वप्रथम संविधान सभेद्वारे संविधानाची निर्मिती केली आहे. अमेरिकेनंतर फ्रान्सने व इतर देशांनी संविधान सभेच्या माध्यमातून लिखित संविधानाचा स्वीकार केला आहे. परंतु यास इंग्लड मात्र अपवाद आहे.

II] भारतातील संविधान सभेचा उदय व विकास -

भारतामध्ये संविधान सभेचा विचार सर्वप्रथम इ.स. 1895 मध्ये लोकमान्य टिळकांनी मांडला. 20 व्या शतकात इ.स. 1922 मध्ये महात्मा गांधी यांनी भारतीय संविधान भारतीयांच्या इच्छेनुसार बनेल, असा विचार मांडला. इ.स. 1924 मध्ये पंडीत मोतीलाल नेहरु यांनी ब्रिटीशां समोर संविधान सभेची मागणी केली. एम. एन. रॉय यांनीही या विचाराचे प्रतिपालन केले. इ.स. 1936 च्या लखनऊ व इ.स. 1938 च्या हरिपूर कॉंग्रेस अधिवेशनात

संविधान सभेची मागणी केली. असे असले तरी या विचाराला मूर्त रूप देण्याचे कार्य पंडीत नेहरू यांनी केले.

ब्रिटीश सरकारने 8 ऑगस्ट 1940 ला या प्रस्तावाला मान्यता दिली. भारतीयांचे संविधान भारतीय बनवतील, यास मान्यता दिली. 29 मार्च 1942 -च्या क्रिप्स योजनेद्वारा भारतामध्ये एक निर्वाचित संविधान सभा असेल, हे मान्य करून 1946 मध्ये कॅबिनेट मिशन योजनेमध्ये भारतीय संविधान सभेच्या प्रस्ताव स्विकारून व्यावहारिक रूप देण्यात आले.

III] संविधान सभेची स्थापना -

कॅबिनेट मिशन योजनेद्वारा भारतीय संवि-धान निर्माण करण्यासाठी निवडणुकीच्या आधारावर एका संविधान सभेची स्थापना करण्यात आली. संविधानसभेमध्ये 389 सदस्य होते. त्यापैकी

1) ब्रिटीश प्रांताचे 292 प्रतिनिधी होते.
2) मुख्य कमिशनरच्या प्रांतांचे 4 प्रतिनिधी होते.
3) देशातील संस्थानिकांचे 93 प्रतिनिधी होते.

389 पैकी पहिल्या दोन प्रतिनिधींची 296 प्रतिनिधी निवडणुकीच्या माध्यमातून निवडण्यात आले. व 93 प्रतिनिधी संस्थानिकांनी नेमले. संविधान सभेच्या निवडणुका जुलै - ऑगस्ट 1946 मध्ये पार पडल्या.

संविधान सभेची पहिली बैठक 9 डिसेंबर 1946 रोजी दिल्ली येथे संसद भवनाच्या केंद्रिय कक्षामध्ये पार पडली. त्यामध्ये डॉ. सच्चिदानंद सिन्हा, यांना तात्पुरते अध्यक्ष म्हणून नेमण्यात आले. बी. एन. राव यांना संविधान सभेच्या संविधानातील सल्लागार या पदावर नियुक्त करण्यात आले. 13 डिसेंबर 1946 ला पंडीत नेहरू यांनी संविधानाचा उद्देश म्हणजे उद्देशपत्रिका किंवा सरनामा प्रस्तुत केला. ही उद्देशपत्रिका 23 जानेवारी 1947 ला स्विकारण्यात आली. त्यात मसुदा समिती ही मुख्य समिती होती.

संविधान सभेने २९ ऑगस्ट 1947 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समिती स्थापन केली. मसुदा समितीमध्ये के. एम. मुन्शी, मुहम्मद सादुल्ला, बी. एल. मित्तल, अल्लादीन कृष्णस्वामी अय्यर, एन गोपाल स्वामी अय्यंगार, डी. पी. खेतान या सदस्यांचा समावेश होता. काही दिवसानंतर डी. एन. मित्तल च्या जागेवर एन. माधवराव व खेतान यांच्या मृत्यूनंतर टी. टी. कृष्णामाचार्य यांना घेण्यात आले. 30 ऑगस्ट 1947 ला मसुदा समितीची पहिली बैठक झाली. इतर समितींच्या शिफारशीवर विचार करण्याचे कार्य मसुदा समितीद्वारे केले जात होते. त्यामुळे या समितीची भूमिका संविधान सभेमध्ये महत्वाची होती. या समितीनी संविधानाचा कच्चा आराखडा / मसुदा तयार करून 1 फेब्रुवारी 1948 ला संविधानसभेच्या अध्यक्षाकडे सुपूर्त केला. संविधान सभेसमोर तो मसुदा ४ नोव्हेंबर 1948 रोजी विचारविनिमय करण्यासाठी ठेवला. संविधान सभेने 1 वर्ष त्यावर विचार विनिमय करून 26 नोव्हेंबर 1950 रोजी संविधानाची अंमलबजावणी करण्यात आली. संविधानात 395 कलम, 22 भाग आहेत. संविधान तयार करण्यासाठी 2 वर्ष, 11 महीने व 18 दिवस लागले.

## 2) भारतीय संविधानाची उगमस्थाने -

### * संविधान निर्मितीची साधने किंवा स्त्रोत -

भारताचे संविधान तयार करताना संविधान सभेच्या सदस्यांनी ज्या साधनाचा वापर केला. त्या साधनाचा किंवा उगमस्थानकांचा विचार करणे आवश्यक आहे. भारतीय संविधानाची साधने दोन भागामध्ये विभाजीत करता येतील.

I] जन्मासंबंधीचे साधने -

II] विकाससंबंधीचे साधने -

जन्मासंबंधीचे साधने -
भारताची राज्यघटना तयार करतांना संविधा-न सभेच्या सदस्यांनी ज्या साधनाचा आधार घेतला, त्यांचा समावेश जन्मासंबंधी साधनामध्ये केला जातो. जन्मासंबंधी साधनाचे देशी साधने व विदेशी साधने या दोन भागात वर्गीकरण करता येते.

1) विदेशी साधने / स्त्रोत-
संविधान सभेच्या सदस्यांनी विविध देशा-च्या राज्यघटनेचा अभ्यास करून, भारतीय परिस्थिती लक्षा घेवून त्यांच्या संविधानातील काही गोष्टींचा स्विकार केला आहे. त्याचा विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

a) ब्रिटीश संविधान -
i) संसदीय लोकशाही शासन व्यवस्था
ii) कायदयाचे राज्य
iii) एकेरी न्यायव्यवस्था
iv) एकेरी नागरिकत्व
v) एकेरी नोकरशाही
vi) कायदा निर्मितीची प्रक्रीया
vii) सामुहीक जबाबदारी
इत्यादी अनेक तत्वांचा स्विकार इंग्लडकडून करण्यात आला आहे.

b) अमेरिकेचे संविधान -
i) उद्देशपत्रिका
ii) मुलभुत आधिकार
iii) न्यायालयीन पुर्नविलोकन
iv) संविधानाचे श्रेष्ठत्व
v) राष्ट्रपतीवरील महाभियोगाचा खटला
vi) उपराष्ट्रपतीचे पद इ. घटकांचा स्विकार अमेरिकेच्या संविधानातून केला आहे.

c) आर्यलॅंडचे संविधान-
i) राज्याची मार्गदर्शक तत्वे
ii) राष्ट्रपतीच्या निवडणुकीतील निर्वाचन मंडळ
iii) राज्यसभेमध्ये साहित्यकला, विज्ञान, समाजसेवा इत्यादी क्षेत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या व्यक्ती, नेमणुक इत्यादी

d) कॅनडाची राज्यघटना-
i) संघराज्याचा स्विकार
ii) शेषाधिकार केंद्रसरकारला असणे
इत्यादीचा स्विकार केलेला आहे.

e) ऑस्ट्रेलियाची राज्यघटना-
i) संविधानाच्या प्रस्तावनेची भाषा
ii) समवृर्ती सुची

f) दक्षिण आफ्रिकेची राज्यघटना-
भारताने संविधानदुरुस्तीची पद्धत दक्षिण आफ्रिकेकडून स्विकारलेली आहे.

g) जर्मनीची राज्यघटना-
जर्मनीकडून राष्ट्रपतीचे आणीबाणी विषयक अधिकार स्विकारण्यात आलेली आहे.

2) देशी साधने-

a) नेहरु रिपोर्ट-
इ. स. 1928 च्या नेहरु रिपोर्टमधील अनेक घटकांचा स्विकार भारतीय संविधानामध्ये केलेला आहे.
i) भारतीय संविधान संघीय स्वरुपाचे असेल
ii) देशातील संस्थानिकांचे वेगळे आस्तित्व असणार नाही.

iii) संस्थानिकांना संघराज्यामध्ये सामील व्हावे लागेल.
iv) अल्पसंख्याकांचे संरक्षण केले जाईल.
इत्यादी. अनेक तत्वांचा स्विकार करण्यात आलेला आहे.

ब
b) 1935 चा कायदा -
भारतीय संविधानावर 1935 च्या कायदया-चाही प्रभाव पडलेला दिसून येतो. 1935 च्या कायदयातील अनेक तत्वे भारतीय संविधानामध्ये घेण्यात आले आहेत.
i) केंद्र आणि राज्यामध्ये सत्ता विभाजन
ii) राज्यपालाचे पद
iii) द्विगृही कायदेमंडळ
iv) सरकारचे तीन अंग - इत्यादींचा स्विकार केलेला आहे.

DACE

विकाससंबंधीची साधने (स्त्रोत) :-
26 जानेवारी 1950 ला राज्यघटनेची अंमलबजावणी झाली. तेव्हापासून आजपर्यंत भारतीय संविधानात मोठ्या प्रमाणात बदल किंवा परिवर्तन झाले आहे. त्या सर्व बदलाचा समावेश विकाससंबंधीच्या साधनामध्ये केला जातो. त्याचा विचार खालीलप्रमाणे करता येईल.
i) कायदा नियम अध्यादेश :
केंद्र सरकार व राज्यसरकारद्वारे कायदे व नियम तयार केले जातात. त्या कायदयांचा व नियमाचा समावेश संविधानाच्या साधनामध्ये होतो. सर्व कायदे व नियम संविधानिक स्वरुपाचे असतात. कायदेमंडळाच्या विश्रांतीच्या काळात राष्ट्रपतीला अध्यादेश काढण्याचा अधिकार आहे. त्याचा समावेश ही संविधानाच्या साधनामध्ये होतो.

2) रुढी, परंपरा, प्रथा व संकेत -

भारतीय संविधानातील अलि-खित भाग म्हणजे रुढी, परंपरा किंवा चालीरिती होय. सरकारमध्ये रुढीपरंपरेला विशेष महत्व असते. या प्रथा संविधानाचा एक भाग असतात. भारतामध्ये अनेक रुढी परंपरा आहेत.

उदा.

संविधानाने सर्व अधिकार राष्ट्रपतीला दिले आहेत. परंतु रुढीपरंपरेनुसार राष्ट्रपती मंत्रीमंडळाच्या किंवा पंतप्रधानाच्या सल्ल्यानुसार त्या अधिकाराचा वापर करतो. पंतप्रधानाची नेमणुक करण्याचा अधिकार राष्ट्रपतीला असला तरी तो लोकसभेतील बहुमत प्राप्त पक्षाच्या नेत्यालाच पंतप्रधान पदी नेमतो.

इत्यादी अनेक रुढी, परंपरा भारतामध्ये अस्तित्वास आहेत.

DACL

3) न्यायालयीन निर्णय -

कायदेमंडळानी तयार केलेल्या कायदयाचा अर्थ लावण्यासाठी, तसेच संविधानातील तरतुदींचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी देशामध्ये न्यायमंडळ कार्यरत आहे. सर्वोच्च व उच्च न्यायालयानी असे अनेक निर्णय दिले आहेत. जे संविधा-नाचे अंग किंवा भाग बनले आहेत.

उदा.

गोपालन विरुद्ध मद्रास राज्य या केसच्या संदर्भात दिलेल्या निर्णय, तसेच केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य या केसच्या संदर्भात दिलेला निर्णय.

4) घटनादुरुस्ती / संविधानसंशोधन

इ. स. 1950 पासून आजपर्यंत कालानुसार राज्यघटनेमध्ये अनेकवेळा दुरुस्ती / परिवर्तन करण्यात आलेले आहे. आतापर्यंत झालेल्या घटनादुरुस्तीमध्ये 42 व 44 वी घटनादुरुस्ती सर्वात मोठी घटनादुरुस्ती आहे.

विकाससंबंधीच्या साधनात सर्व घटनादुरुस्तींचा समावेश होतो.

संविधानावरील ग्रंथ किंवा तज्ञांचे विचार-

भारतीय संविधानाच्या उगमस्थानकमध्ये संविधानावरील ग्रंथाचाही समावेश होतो. भारतीय संविधानावर अनेकांनी ग्रंथ लिहीले आहेत. त्यासर्व ग्रंथाचा समावेश यामध्ये होतो. डी. टी. बसु, एम. ए. पालकीवाल एम. सी. सित्तलवाड, सुभाष कश्यप इ. अनेक तज्ञांनी संविधानावर ग्रंथ लिहीले आहेत.

इत्यादी अनेक साधनांचा समविश केला जातो

## ३) भारतीय संविधानाची उद्देशपत्रिका =

I] प्रस्तावना-

प्रत्येक देशाच्या किंवा देशातील संविधानाच्या प्रारंभी उद्देशपत्रिका किंवा सरनामा असतो. सरनाम्यामध्ये संपूर्ण संविधानाचा सारांश स्पष्ट केलेला असतो. प्रत्येक देशाची राज्यघटना कोणत्यातरी उद्देशाने प्रेरित होवून लिहीलेली असते. "त्या उद्देशाच्या संक्षिप्त मांडणीला उद्देशपत्रिका असे म्हणतात." उद्देशपत्रिका ही महत्वाची असते संविधानाचा प्राण / आत्मा किंवा महत्वाचा भाग म्हणून उद्देशपत्रिकेचा उल्लेख केला जातो. के. एम. मुन्शी यांनी उद्देशपत्रिकेला राजकीय जन्मकुंडली असे म्हणतात. संविधानाचे मापन करण्याचे हे एक मापदंड आहे. संविधानाचे सर्व कलम या मापदंडाने मोजले जातात. असे असले तरी कायद्याच्या दृष्टीने उद्देशपत्रिकेला संविधानाचा भाग समजले जात नाही. किंवा उद्देशपत्रिका कायद्याच्या नियंत्रणात राहत नाही.

इ. स. 13 डिसेंबर 1946 ला पंडीत नेहरु यांनी संविधानसभेसमोर उद्देशपत्रिकेचा प्रस्ताव मांडला.

संविधानसभेने 22 जानेवारी 1947 ला उद्देशपत्रिकेचा प्रस्ताव स्विकारला. इ.स. 26 नोव्हेंबर 1949 ला उद्देशपत्रिका मंजूर करण्यात आली.

उद्देशपत्रिका –

आम्ही भारतीय जनता,
भारताचे सार्वभौम, समाजवाद, धर्मनिरपेक्ष, प्रजासत्ताक,
गणराज्य निर्माण करण्याचे आणि
भारताच्या सर्व नागरिकांना

सामाजिक, आर्थिक आणि राजकीय .... न्याय
विचार, उच्चार, विश्वास
श्रद्धा आणि उपासना
यांचे ........ स्वातंत्र्य
दर्जा आणि संधी याबाबत समता
व्यक्तीची प्रतिष्ठा आणि
राष्ट्राचे ऐक्य आणि अखंडता राखणारी .... बंधुता
याची ~~स्व~~ शाश्वती देण्याचे आमच्या या
घटनासमितीत आज नोव्हेंबर 1949
च्या 26 व्या दिवशी विचारपूर्वक
ठरवित आहोत व ही घटना
आमच्यासाठी तयार, मान्य, स्वीकृत
करीत आहोत.

वरील उद्देशपत्रिकेमध्ये ① समाजवाद ② धर्मनिरपेक्ष ③ अखंडता या तीन शब्दांचा समावेश इ.स. 1976 मध्ये 42 वी घटनादुरुस्ती करुन करण्यात आलेला आहे. मुळ संविधानाच्या उद्देशपत्रिकेमध्ये 1976 च्या अगोदर हे तीन शब्द नव्हते.

उद्देशपत्रिकेवरुन तीन गोष्टी स्पष्ट होतात.

1) संविधानाचे उगमस्थान -

आम्ही भारतीय जनता या वाक्याने उद्देशपत्रिकेची सुरुवात आहे. संविधानाचे उगमस्थान भारतीय जनता आहे. भारतीय जनतेनीच संविधान तयार केले. मान्यता देवून स्वीकृत केली. हे स्पष्ट होते. हे संविधान जनतेवर कोणीही लादलेले नाही हे स्पष्ट होते.

2) राज्यव्यवस्थेचे स्वरुप -

उद्देशपत्रिकेवरुन भारतातील राज्यव्यवस्थेचे स्वरुप स्पष्ट होते. सार्वभौम, समाजवाद, धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताक गणराज्याचे स्वरुप भारताच्या राज्यव्यवस्थेचे आहे. हे स्पष्टपणे लक्षात येते.

3) राज्य:

उद्देशपत्रिकेवरुन भारतातील राज्यव्यवस्थेच्या स्वरुपाप्रमाणेच राज्यव्यवस्थेचा उद्देशही स्पष्ट होतो. राज्याची काही ध्येय किंवा उद्दिष्ट्ये असतात. त्या ध्येयाची पुर्तता करण्याचे काम सरकारद्वारे केली जातात. त्याशिवाय समाजाला पर्यायाने राज्याला स्थैर्य प्राप्त होत नाही. स्वातंत्र्य समता, न्याय, बंधुता ही चार राज्याची उद्दिष्ट्ये आहेत. त्यांचाही उद्देशपत्रिकेमध्ये स्पष्ट उल्लेख करण्यात आलेला आहे.

## 4) भारतीय राज्यघटनेची वैशिष्ट्ये -

प्रस्तावना -

भारतीय संविधानाची निर्मिती संविधान सभेद्वारे झालेली आहे. संविधान सभेमध्ये 389 सदस्य होते. संविधान सभेचे डॉ. सच्चिदानंद सिन्हा अस्थायी किंवा तात्पुरते अध्यक्ष होते. व डॉ. राजेंद्रप्रसाद हे स्थायी अध्यक्ष होते. या घटनापरिषदेच्या सदस्यांनी 2 वर्ष 11 महीने व 18 दिवसात भारताची राज्यघटना तयार केली. घटना तयार करताना विविध समित्याची स्थापना करण्यात आली होती.

त्यात मसुदा समिती महत्त्वाची होती. मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होते. विविध देशाच्या संविधानाचा अभ्यास करून भारताची राज्यघटना तयार करण्यात आली. इंग्लडच्या राज्यघटनेवर पडलेला आहे. 26 नोव्हेंबर 1949 रोजी संविधानसभेनी राज्यघटनेला मंजुरी दिली. व 26 जानेवारी 1950 पासून भारताच्या राज्यघटनेची अंमलबजावणी झाली. त्या संविधानाची वैशिष्ट्ये किंवा लक्षणे पुढीलप्रमाणे आहेत.

1) लिखीत राज्यघटना -

संविधानाचे लिखीत व अलिखीत अशा दोन भागात विभाजन केले जाते. देशाचा राज्यकारभार करण्यासाठी तयार करण्यात आलेले नियम, कायदे लिहून ठेवण्यात आलेले असतील तर ही राज्यघटना लिखीत स्वरूपाची असते. भारताची राज्यघटना ही लिखीतच आहे. जगामध्ये लिखीत राज्यघटनेचा स्विकार सर्वप्रथम अमेरिकेमध्ये करण्यात आलेला आहे. इंग्लड सोडून इतर सर्व देशाच्या राज्यघटना लिखीत स्वरूपाच्याच आहेत. जगातील एकमेव अलिखीत राज्यघटना इंग्लडची आहे.

2) मोठी (विस्तृत) राज्यघटना -

भारताची राज्यघटना जगामध्ये सर्वात मोठी आहे. संविधानातील कलमाच्या संख्येवरून राज्यघटना लहान आहे की मोठी आहे, ते ठरविले जाते. भारताच्या राज्यघटनेत 395 कलम, 12 परिशिष्ठे, व 22 भाग आहेत भारताच्या संविधानात प्रत्येक गोष्टीचा सविस्तर उल्लेख करण्यात आलेला आहे.

उदा. मुलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्वे विस्तृतपणे मांडलेले आहे. त्यामुळे भारताची राज्यघटना मोठी दिसून येते. जगामध्ये सर्वात लहान राज्यघटना अमेरिकेची आहे. अमेरिकेची राज्यघटना 7 कलमाची व 12 पृष्ठाची आहे.

(3) निर्मित राज्यघटना -

संविधानाचे निर्मित व अनिर्मित (विकसित) किंवा (उत्क्रांत) या दोन भागात वर्गीकरण केले जाते. संविधान विशिष्ठ सदस्य एकत्र येवून विशिष्ठ काळात बैठका, चर्चा करून संविधान सभेद्वारे तयार केले असेल तर त्यास निर्मित राज्यघटना असे म्हणतात. विशिष्ठ सदस्य एकत्र न येता, रूढी-परंपरेनुसार राज्यघटना अस्तित्व-त आलेली असेल तर त्यास विकसित किंवा अनिर्मित राज्यघटना असे म्हणतात. भारताची राज्यघटना निर्मित आहे. जगामध्ये एकमेव इंग्लडची राज्यघटना अनिर्मित किंवा विकसित आहे.

(4) संमिश्र राज्यघटना -

भारताची राज्यघटना संमिश्र स्वरूपाची आहे. घटना (संविधान) तयार करताना घटनाकारकांनी इतर देशाच्या संविधानाचा अभ्यास करून त्यांची चांगल्या तत्वाचा स्विकार करून भारताची राज्यघटना तयार केली आहे. त्यामुळे संमिश्र राज्यघटना हे एक संविधानाचे वै-शिष्ट्ये सांगितले जाते.

उदा: इंग्लडकडून संसदीय लोकशाहीचा, अमेरिकेकडून मुलभूत हक्काचा, आर्यलँडकडून मार्गदर्शक तत्वाचा, कॅनडाकडून संघराज्याचा, फ्रान्सकडून गणराज्याचा स्विकार करून भारताची राज्यघटना तयार करण्यात आली.

(5) अंशत: ताठर व अंशत: लवचिक राज्यघटना -

एखादया देशाची राज्यघटना ताठर आहे का लवचिक आहे, हे घटनादुरूस्तीच्या पद्धतीवरून लक्षात येते. घटनादुरूस्तीची पद्धत साधी, सोपी असेल तर त्या देशाची राज्यघटना लवचिक असते. आणि घटनादुरूस्तीची पद्धत अवघड किंवा कठिण असेल तर त्या देशाची राज्यघटना लवचिक नसते. इंग्लडची राज्यघटना लवचिक तर-

अमेरिकेची राज्यघटना ताठर स्वरुपाची आहे. परंतु भारताचे संविधान इंग्लंडप्रमाणे लवचिक नाही आणि अमेरिकेप्रमाणे ताठर नाही. तर भारताने या दोन्ही पद्धतींचा स्विकार केलेला आहे. साध्या बहुमताने विशेष बहुमताने भारतीय संविधानात बदल केला जात असल्यामुळे भारताचे संविधान अंशतः ताठर आणि अंशतः परिवर्तनीय दिसून येते.

⑥ सार्वभौम, समाजवाद, धर्मनिरपेक्ष, प्रजासत्ताक, गणराज्याचा स्विकार -

संविधानाच्या उद्देशपत्रिकेमध्ये याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. भारत देशांतर्गत व बाह्यदृष्ट्या स्वतंत्र्य किंवा सार्वभौम आहे. भारतावर कोणाचेही प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष नियंत्रण नाही. 15 ऑगस्ट 1947 पासून भारत सार्वभौम राज्य बनले आहे.

भारताने समाजवादाचाही स्विकार केलेला आहे. आर्थिक, सामाजिक समता प्रस्थापित करणे. श्रीमंत गरीबामधील भेदभाव दूर करणे, बेकारी दूर करणे, प्रत्येका-च्या हाताला काम देणे, हा उद्देश राज्याचा असतो. तसेच राज्यासमोर सर्वधर्म समान असतील. कोणत्याही धर्माला राज्याद्वारे विशेष स्थान दिले जाणार नाही. भारत हे धर्मनिरपेक्ष राज्य असले तरी भारतीय नागरिकांना धार्मिक स्वातंत्र्य असते.

भारतात प्रजासत्ताक म्हणजे लोकशाही शासन व्यवस्था असेल. भारतात अंतीम सत्ता लोकांची आहे. प्रतिनिधीच्या माध्यमातून लोक किंवा जनता राज्यकारभार करत असतात. लोकशाहीबरोबर गणराज्याचाही स्विकार केलेला आहे. राज्याचा प्रमुख जनतेतर्फे प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष-पणे निवडला जातो.

⑦ संसदीय शासनव्यवस्थेचा स्विकार -

भारतामध्ये संसदीय लोकशाही शासनव्यव-स्थेचा स्विकार करण्यात आलेला आहे. संसदीय शासनव्यव-स्थेचा स्विकार इंग्लंडकडून केला आहे. संसदीय शासनव्य

वस्थेमध्ये संसद सर्वश्रेष्ठ असते. शासनाचे एक वास्तविक व एक नाममात्र असे दोन प्रमुख असतात. कायदेमंडळा-तून कार्यकारी मंडळाची निर्मिती केली जाते. (मंत्रीमंड-ळाची). मंत्रीमंडळातील मंत्री हा कायदेमंडळाचा सदस्य असायला हवा, नसल्यास त्याने 6 महीन्याच्या आत कायदेमंडळाचे सदस्यत्व स्विकारले पाहिजे. संसदीय शासनव्यवस्थेत कायदेमंडळाचे कार्यकारी मंडळावर नियंत्रण असते. कार्यकारी मंडळ म्हणजेच मंत्रीमंडळ होय. कार्यकारी मंडळ हे कायदेमंडळास वैयक्तिक व सामुहीकरीत्या जबाबदार असते. यास संसदीय शासन-व्यवस्था असे म्हणून ओळखले जाते.

④ एकात्म शासन व्यवस्थेकडे झुकलेले संघराज्य-

शासनाचे एकात्म शासन व्यवस्था व संघात्मशासनव्यवस्था या दोन भागामध्ये वर्गीकरण विभाजन केले जाते. केंद्रसरकार व राज्यसरकार यांच्यात विभागणी केली जाते. त्या शासनव्यवस्थेला संघराज्य असे म्हणतात. केंद्रसरकार व राज्यसरकार यांच्यात सत्तेची विभागणी न करता सर्व सत्ता केंद्रसरकारच्या हातामध्ये असेल तर त्या शासनव्यवस्थेला एकात्मशासन व्यवस्था असे म्हणतात. एकात्म शासनव्यवस्थेमध्ये एकेरी संविधानाचा / एकेरी नागरिकत्वाचा / एकेरी न्यायव्यवस्थेचा स्विकार केला जातो. भारतीय शासन व्यवस्था कशी असेल याची तरतूद संविधानाच्या कलम 1 ते 4 मध्ये करण्यात आलेली आहे. भारताच्या संविधानात संघराज्याऐवजी राज्याचा ( Union of state) असा उल्लेख केला जातो. भारतात काही तत्व संघराज्याचे, तर काही तत्वे एकात्म शासन व्यवस्थेची स्विकारण्यात आलेली आहेत. भारताच्या संघराज्यास अर्धसंघराज्य किंवा एकात्म शासनव्यवस्थेकडे झुकलेले संघराज्य असे म्हणतात.

(9) सरनामा / उद्देशपत्रिका / प्रस्तावना :-

उद्देशपत्रिकेला राज्यघटनेचे अंग / भाग समजला जात नाही, परंतु उद्देशपत्रिका हा संविधानाचा आत्मा आहे. इ.स. 1976 च्या 42 व्या घटनादुरुस्ती -नुसार भारताचे वर्णन "सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक" वरुन सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही प्रजा -सत्ताक असा केला जातो.

के.एम. मुन्शी यांनी भारतीय संविधा -नाच्या उद्देशपत्रिकेस 'राजकीय जन्मकुंडली' असे म्हटले. 13 डिसेंबर 1946 रोजी पं. नेहरुनी उद्देशपत्रिक मांडली. 26 जानेवारी 1949 ला ती मंजूर करण्यात आली.

(10) मुलभूत अधिकार :-

भारतीय संविधानाच्या तिसऱ्या भागातील कलम 12 ते 35 मध्ये मुलभूत हक्काचा उल्लेख करण्यात आलेला आहे. भारतीय मुलभूत हक्काचा स्विकार अमेरि -केकडून केलेला आहे. मुलभूत हक्कामध्ये

1. समतेचा हक्क
2. स्वातंत्र्याचा हक्क
3. शोषणाविरुद्धचा हक्क
4. धर्मस्वातंत्र्याचा हक्क
5. शिक्षण व संस्कृतीचा हक्क
6. न्यायालयीन संरक्षणाचा हक्क

इ. सविस्तरपणे उल्लेख करण्यात आलेला आहे. व त्यास न्यायालयीन संरक्षण प्राप्त झाले -ले आहे.

(11) मार्गदर्शक / नीतिनिर्देशक तत्वे :-

भारतीय संविधानाच्या चौथ्या भागात कलम 36 ते 51 मध्ये राज्याची मार्गदर्शक / नीतिनिर्देशक तत्वांचा उल्लेख केला आहे. भारताने या तत्वांचा स्विकार आयर्लंडकडून केला आहे. मुलभूत हक्कांना

न ठावलता राज्यांनी करावयाच्या कामाचा समावेश मार्ग-दर्शक तत्वामध्ये करण्यात आलेला आहे. सरकारने कोणत्या गोष्टी कराव्यात याची तरतूद मार्गदर्शक तत्वामध्ये करण्यात आली आहे. मार्गदर्शक तत्वे ही राज्यासाठी आहेत.

(12) मूलभूत कर्तव्ये :-

मुलभूत अधिकाराबरोबर नागरिकांना आपल्या कर्तव्याची जाणीव व्हावी, यासाठी मुलभूत कर्तव्यांचा समावेश इ.स. 1976 मध्ये संविधानामध्ये करण्यात आलेला आहे. मुळ संविधानात किंवा 1976 च्या पूर्वी मुलभूत कर्तव्याचा समावेश संविधानामध्ये नव्हता. सरदार, स्वर्णसिंह समितीच्या शिफारशीनुसार 1976 मध्ये 42 वी घटनादुरुस्ती करून संविधानाच्या कलम 51 (अ) मध्ये 10 मुलभुत कर्तव्याचा समावेश करण्यात आलेला आहे. साम्यवादी देशाकडून किंवा सोव्हियत रशीयाकडून भारताने मुलभूत कर्तव्याचा स्विकार केलेला आहे.

DACL

(13) एकेरी संविधान -

एकेरी संविधान हे एकात्म शासन व्यवस्थेचे वैशिष्ट्य आहे. देशातील घटकराज्याचे वेगळे संविधान न तयार करता संपूर्ण देशासाठी एकच संविधान भारतामध्ये तयार करण्यात आले आहे. परंतु यास जम्मू-काश्मिर अपवाद आहे. अमेरिकेप्रमाणे घटकराज्याचे वेगळे आणि देशाचे वेगळे असे दुहेरी संविधान भारतामध्ये नाही. भारतामध्ये एकेरी संविधानाचा स्विकार करण्यात आलेला आहे.

(14) एकेरी नागरिकत्व -

एकेरी आणि दुहेरी असे नागरिकत्वाचे दोन प्रकार पडतात. देशामध्ये कोणत्याही घटकराज्यामध्ये राहणाऱ्या व्यक्तींना आपापल्या घटकराज्याचे नागरिकत्व न देता संपूर्ण देशाचे एकच नागरिकत्व दिले जाते. त्यास

एकेरी नागरिकत्व असे म्हणतात. अमेरिकामध्ये मात्र दुहेरी नागरिकत्व आहे.

(15) एकेरी न्यायव्यवस्था -

भारतामध्ये एकेरी न्यायव्यवस्थेचा स्विकार करण्यात आला आहे. पिरॅमिडसारखी न्यायव्यवस्था असून एका समान कायद्यानुसार न्यायदानाचे कार्य केले जाते. वरिष्ठ न्यायालयाचा निर्णय कनिष्ठ स्तरावरील न्यायालयावर बंधनकारक असतो. भारतामध्ये सर्वोच्च न्यायालय अंतिम स्वरूपाचे न्यायालय आहे.

(16) जनतेचे सार्वभौमत्व -

भारतीय संविधानाने जनतेचे सार्वभौमत्व प्रस्थापित केले आहे. संविधानाची सुरुवात आम्ही भारतीय जनता या वाक्याने झाली आहे. तसेच उद्देशपत्रिकेच्या शेवटी हे संविधान स्वीकृत मान्य करीत आहोत, असे स्पष्ट करण्यात आले आहे. अंतिम सत्ता जनतेच्या हातामध्ये देण्यात आली आहे, जनता आपल्या प्रतिनिधींच्या माध्यमातून राज्यकारभार करीत असते. कोणत्या व्यक्तीच्या किंवा पक्षाच्या हातामध्ये सत्ता द्यायची हे निवडणुकीच्या माध्यमातून जनता ठरवत असते.

(17) इतर वैशिष्ट्ये -

वरील वैशिष्ट्याशिवाय भारतीय संविधानाचे इतर अनेक वैशिष्ट्ये सांगता येतील. त्यामध्ये न्यायमंडळाचे स्वातंत्र्य, संविधानाचे श्रेष्ठत्व, कायद्याचे अधिराज्य, नियंत्रण आणि संतुलन, कल्याणकारी राज्य, आणीबाणीची तरतूद, गणराज्याचा स्विकार, स्वतंत्र निवडणुका, निपक्षपातीपणे निवड, प्रौढ मताधिकार, सत्तेचे विकेंद्रीकरण, स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्यायालयीन पुर्नविलोकन व द्विगृही कायदेमंडळ, सत्ता विभाजन इत्यादी अनेक वैशिष्ट्ये भारतीय संविधानाची सांगितले जातात.